# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 11/03/2023 (शनिवार) सायंकाळ

---

### विनयभंग

पो.स्टे. सावनेर :- दिनांक १९/०९/२०१४ चे ९.३० वा. ते दिनांक ०९/०३/२०२३ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी वय २५ वर्ष ही गुरूनानक कॉलेज कळमेश्वर येथुन कालेजच्या बसनी फिर्यादी व तिच्या मैत्रीणी सावनेर ते कळमेश्वर येथे जात असताना **बस ड्रायव्हर आरोपी नामे- घनश्याम कोल्हे, रा. खापा** यांचे सोबत दररोज बसने जात येत असल्याने ओळख असल्याने फिर्यादीने त्याला कॉलेजला जाणाऱ्या बसचे वेळेबाबत विचारपुस करीत असता फिर्यादी हीचे लग्न नामे- रूषभ मंथनवार, रा. वर्धा यांचे सोबत जुळल्याने व तीचे साक्षगंध झाल्याने ती गोष्ट आरोपीला माहीत झाल्याने आरोपीने फिर्यादीला फोनवर म्हटले की ''मी तुझ्यावर प्रेम करतो तुझ्यासोबत लग्न करायला तयार आहे.'' फिर्यादीचा छुपा पध्दतीने पाठलाग करून फिर्यादीचे होणारे पती व सासुला आरोपीने सांगीतले की आमचे एकमेकांवर प्रेम आहे, आम्ही लग्न करणार आहे असे फोन करून व फिर्यादीला फेसबुकवर मेसेज करून तु माझ्यासोबत लग्न नाही केल्यास मारून टाकण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ अ, ३५४ ड, ५००, ५०६ भादवि. कायद्याअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हावरे मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कन्हान :- दिनांक ०८/०३/२०२३ चे १७.३० वा. ते १७.४० वा. चे सुमारास पो.स्टे. कन्हान हद्यीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही सायंकाळी गेटवर उभी होती त्यानंतर कोणालाही काही न सांगता अचानक निघुन गेली तिचे आरोपी संशयीत नामे- तुषार गुरधे याचे सोबत प्रेंमसंबंध असल्याची माहीती मिळाली. आरोपी हा सुध्दा दि. ०८/०३/२०२३ पासुन हा घरुन निघुन गेला आहे. आरोपीने फिर्यादीचे मुलीला फुस लावुन पळविल्याचा संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी सपोनि. मेश्राम पोस्टे कन्हान मो. नं. ९९२३७९८६८८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर